ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 58.

वर्ष २७ | पुणें, बुधवार तारीख १६ ऑगस्ट, १९६१ | अंक १६

**आश्चर्यकारक बहु-उद्देशीय विमा पॉलिसी**

## त्यानें अेकदांच २८८ रु. भरले व कुटुंबासाठीं १,०१,८८० रु. ठेवले ....

घरांतील कर्त्या माणसाच्या निधनाबरोबरच, घरांत येणारा उत्पन्नाचा झराहि आटतो. पण, बहु-उद्देशीय पॉलिसी घेणारा कर्ता माणूस जातो, तेव्हां उत्पन्नाचा नवा झरा त्याच्या घरांत निर्माण होतो. पुढें दिलेल्या सत्यकथे-वरून ह्या अद्‌भुत पॉलिसीच्या सामर्थ्याची कल्पना येईल.

● एकदां एका तरुण इंजिनियरने एक २०,००० रुपयांची बहु-उद्देशीय पॉलिसी दुहेरी अपघाताच्या फायद्यासह घेतली. दैवयोगानें थोड्याच दिवसांत त्याला अपघात झाला व तो मरण पावला. त्या पॉलिसीमुळें त्याच्या कुटुंबियांस :-

- *लगेच २०,००० रुपये मिळाले (दुहेरी अपघाताचा फायदा),*
- *अधिक २,००० रुपये मृत्युसंस्कार, कायद्याच्या व इतर खर्चासाठीं मिळाले,*
- *अधिक दरमहा रु. ४०० दोन वर्षेपर्यंत मिळण्याची तरतूद झाली,*
- *अधिक दरमहा रु. २०० पुढें २१ वर्षेपर्यंत मिळण्याची खात्री देण्यांत आली,*
- *अधिक बोनसची रक्कम मिळेल,*
- *अधिक रु. १८,००० पॉलिसीची मुदत संपल्यावर मिळतील.*

ह्या तरुण गृहस्थानें हप्त्याचें रूपाने अवघे २८८ रुपये भरले. पण त्याबद्दल, त्याच्या कुटुंबाला २३ वर्षांच्या काळांत, ठराविक अंतराने, एकूण १,०१,८८० रुपये मिळतील. तो जगला असतां तर अर्थातच पॉलिसीची मुदत संपल्यावर २०,००० रुपये व बोनसची रक्कम त्याला मिळाली असती.

**बहु-उद्देशीय विमा पॉलिसी लगेच घ्या. त्यामुळें तुमच्या कुटुंबास खरेंखरें संरक्षण मिळते.**

आयुर्विम्याला पर्याय नाहीं

pratibha-61-8

# विविध माहिती

**कोयना-योजनेसाठी कर्ज**—कोयना जलविद्युत्‌केंद्राच्या कामासाठी भारत सरकारनें महाराष्ट्र सरकारला १·४३ कोटी रुपयांचें कर्ज चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीसाठी म्हणून मंजूर केलें आहे. १९५४-५५ पासून कोयना योजनेसाठी मध्यवर्ती सरकारनें वेळोवेळीं २८·४९ कोटी रुपयांचें कर्ज दिलेलें आहे. कोयना जलविद्युत्‌केंद्रांतील पहिला जनरेटर ह्या वर्षअखेर सुरू होणार आहे. तसें झाल्यास ६०,००० किलोवॅट वीज उपलब्ध होईल.

**स्त्रियांनीं चालविलेली पंचायत**—नळगोंडा जिल्ह्यांतील एका गांवांतील पंचायतीचा कारभार गेलीं दोन वर्षे स्त्रियांनीं चालविलेला आहे. ह्या पंचायतीच्या ८ जागांपैकी ७ जागांवर स्त्री-उमेदवारांची निवड झालेली आहे. ग्रामपंचायतीच्या सर्व सभासदांची निवड एकमतानें झाली आहे. खेड्यांचा कारभार ग्रामपंचायतीच्या द्वारां स्त्रियांनीं चालविल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे.

**भूतानला आर्थिक मदत**—भूतानच्या पंचवार्षिक कार्यक्रमांसाठी मदत म्हणून भारतानें १८ कोटी रुपये देण्याचें ठरविलें आहे. भूतानच्या पंचवार्षिक कार्यक्रमांत मुख्य भर नवे रस्ते बांधण्यावर देण्यांत आलेला आहे. परदेशाचें आक्रमण झाल्यास भूतानचें संरक्षण करण्याच्या कामीं रस्त्यांचा फार उपयोग होईल. १८ कोटी रुपयांपैकी १२ कोटी रुपये भूतान भारताला जोडणाऱ्या रस्त्यांवर खर्च होणार आहेत.

**आंध्र सरकारचें सचिवालय**—हैदराबादच्या बेगमपेठ ह्या उपनगरांत आंध्र सरकारनें सचिवालयाची नवी इमारत बांधण्याचें ठरविलें आहे. ह्या इमारतीसाठी १·२५ कोटी रुपये खर्च येईल. सध्यां आंध्र सरकारला सरकारी कचेऱ्यांसाठी दरसाल ७ लाख रुपये भाडें भरावें लागतें. नवी इमारत तयार झाली कीं सरकारची एवढी रक्कम दरसाल वांचेल. शिवाय कामाचें एकसूत्रीकरण करतां येईल.

**कोल्हापूर येथील टेलिफोन्स**—सध्यां कोल्हापूर शहरांत ७०० टेलिफोन्स आहेत. त्यांत आणखी १०० टेलिफोन्सची भर लवकरच पडणार आहे. चालू वर्षअखेर कोल्हापूरमधील टेलिफोन्सची संख्या १,००० पर्यंत जाईल. कोल्हापूर टेलिग्राफ डिव्हिजन नुकतीच उघडण्यांत आली असून रत्नागिरी व कोल्हापूर जिल्हे आणि सांगली जिल्ह्याचा कांहीं भाग ह्यांचा त्यांत समावेश केला आहे.

**सहकारी साखर कारखान्याची मदत**—सणसर येथील छत्रपति शिवाजी सहकारी साखर कारखान्यातर्फे पुण्यांतील पूरग्रस्तांना मदत म्हणून ५,००० रुपयांचा चेक पाठविण्यांत आला आहे. त्याशिवाय कारखान्यांतील कामगारवर्गानें आपलें एक दिवसाचें वेतन मदतीदाखल दिलें. ही मदत १,००० रुपयांची झाली. रोख मदतीशिवाय धान्य, कपडे, भांडीं, पांघरुणें, इत्यादींच्या रूपांतहि मदत देण्यांत आली.

**चीन-सीलोन व्यापारी देवाणघेवाण**—चीनच्या सरकारनें सीलोनच्या रेल्वेसाठी लागणारे मालवाहू आणि उतारूंचे डबे पुरविण्याची तयारी दाखविली आहे. ह्या मालाच्या बदला सीलोन चीनला कोणता माल पुरविणार तें समजलेलें नाहीं. परंतु चीन बहुधा चहा घेणें पसंत करील. चीनकडून मिळणाऱ्या रेल्वेच्या डब्यांची पहाणी करण्यासाठी सीलोनच्या सरकारनें आपलें एक मंडळ तिकडे पाठविलें आहे.

**मध्यप्रदेशांत दोन वैद्यकीय कॉलेजें**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत मध्यप्रदेश सरकारनें दोन नवीं वैद्यकीय कॉलेजें स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या संस्था रेवा आणि रायपूर ह्या ठिकाणीं काढण्यांत येणार आहेत. मध्यप्रदेशांत सुमारें १५० सरकारी इस्पितळें व दवाखाने असे आहेत कीं त्यांत डॉक्टर्सची उणीव आहे. सर्व इस्पितळांतून व दवाखान्यांतून डॉक्टर्स पुरवण्यासाठी अद्याप दोन वर्षे तरी लागतील.

**कराच्या पद्धतींत बदल**—सुरत म्युनिसिपालिटी मालमत्तेवरील सर्वसाधारण कराच्या पद्धतींत बदल करणार आहे. सध्यां मालमत्तेच्या किंमतीच्या प्रत्येक १०० रुपयामागें ४० नये पैसे कर वसूल करण्यांत येतो. ह्या पद्धतीनें म्युनिसिपालिटीला ११ लाख रुपये उत्पन्न मिळतें. आतां घराला येणाऱ्या भाड्याच्या रकमेच्या आधारानें करआकारणी करण्यांत येणार आहे.

**कठीण धातूवरील खोदकाम**—कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च ह्या संस्थेनें कठीण धातूंवर नांव घालणें, आंकडे खोदणें, ट्रेडमार्क खोदणें, हीं कामें करण्याची एक नवीन पद्धत शोधून काढली आहे. ह्या पद्धतीनें खोदकाम करण्यास वेळ कमी लागतो व खर्चहि कमी येतो. ह्या कामासाठी बॅटरीमधील विजेचा उपयोग करण्यांत येतो.

**दरोडेखोरीवर उपाययोजना**—राजस्थान आणि मध्यप्रदेश ह्यांच्या सीमेवरील भागांत दरोडेखोरांचा सुळसुळाट आहे. ह्यावर उपाय म्हणून ह्या भागांतील चंबळेच्या खोऱ्यांत छोट्या उद्योगधंद्यांची स्थापना करण्याचा विचार चालू आहे. उद्योगधंद्यांची स्थापना करतांना स्थानिक परिस्थितीचा विचार प्रामुख्यानें करण्यांत येईल. राजस्थान राज्याच्या औद्योगीकरणाचा हा एक भाग आहे.

**खाजगी मालकीचीं जंगलें**—केरळ राज्यांतील खाजगी मालकीचीं जंगलें ताब्यांत घेण्याच्या हेतूनें राज्य सरकार एका बिलाचा विचार करीत आहे. जंगलाच्या मालकांना नुकसानभरपाई देण्याची तरतूद करण्यांत येणार आहे. केरळ राज्याच्या मलबार विभागांत खाजगी मालकीचीं बरींच जंगलें असून त्यांचें एकूण क्षेत्रफळ सुमारें १२०० चौरस मैल इतकें भरेल.

**भाक्रा-नांगलसाठी कर्ज**—भाक्रा-नांगल धरणाच्या १९६१-६२ मध्यें होणाऱ्या कामासाठी पंजाब सरकारला मध्यवर्ती सरकारनें १॥ कोटी रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. ह्या धरणासाठी पंजाब सरकारला आतांपर्यंत १ अब्ज, ९३ कोटी, ६७ लक्ष रुपये कर्ज देण्यांत आलें आहे. कर्जाचा चालू हप्ता त्यांत धरलेला आहे.

**हौशी प्रवाशांसाठी खास मोटारी**—मद्रास शहरांत हौशी प्रवाशांसाठी खास भाड्याच्या गाड्या चालू करण्यांत आल्या आहेत. ह्या गाड्या खाजगी गाड्यासारख्याच दिसतात. फक्त त्यांच्या नंबराच्या पाटीवर T हें इंग्रजी अक्षर तांबड्या रंगांत रंगविलेलें असतें. अशाच प्रकारच्या खास मोटारगाड्या दिल्ली व मुंबई ह्या शहरांतहि आहेत.

**युरोपचें हवामान बदलण्याची शक्यता**—सैबेरियांतील दोन उत्तर-प्रवाही नद्या दक्षिणवाहिनी करून मध्य आशिआंत एक समुद्र निर्माण करण्याची योजना रशिआनें आंखली आहे. योजना अमलांत आली तर सैबेरिआंतील हिंवाळा व उन्हाळा सौम्य होईल आणि युरोपमधील कांहीं देशांच्या हवामानावरहि बराच परिणाम होईल असा अंदाज आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १६ ऑगस्ट, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## साखरेच्या जादा उत्पादनामुळें उत्पन्न झालेली चिंता

इंडिअन शुगर मिल्स असोसिएशन ह्या संघटनेची साधारण वार्षिक सभा दिल्ली येथें भरविण्यांत आली होती. सभेचें उद्घाटन भारताचे अन्न व शेतकी मंत्री श्री. स. का. पाटील ह्यांनीं केलें. असोसिएशनचे अध्यक्ष श्री. डी. डी. पुरी ह्यांनीं आपल्या भाषणांत साखरेच्या वाढलेल्या उत्पादनामुळें साखरेच्या धंद्यांपुढें पेंचप्रसंग निर्माण झाला असून ह्या धंद्याचें भवितव्य चिंताजनक असल्याचें सांगितलें. ते म्हणाले कीं सरकारनें साखरेच्या निर्यातींत वाढ होईल, उत्पादन व सांठा घटेल आणि खप वाढेल अशा प्रकारचे कारभारविषयक व द्रव्यविषयक उपाय योजावेत. चालू वर्षी भारतांत १४.७५ लाख टन साखर शिल्लक राहील. ह्यांतून कांहीं साखर निर्यात केली जाईल. चालू वर्षी २९.७५ लाख टन साखरेचें उत्पादन होईल असा अंदाज आहे. ह्यांत मागील हंगामांतील ५.५ लाख टन साखर मिळविली पाहिजे. ह्या एकूण साखरेपैकीं सुमारें २०.५ लाख टन साखरेचा खप होईल. तरीसुद्धां शिल्लकी साखरेमुळें साखर कारखान्यांना बिकट अडचणींच्या परिस्थितीला तोंड द्यावें लागणार आहे. श्री. पुरी ह्यांच्या भाषणानंतर अन्नमंत्री श्री. स. का. पाटील ह्यांनीं साखरेच्या धंद्यापुढील अडचणींबाबत आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं साखरेच्या धंद्यापुढील अडचणी अतिशय चिंताजनक आहेत असें मानण्याचें कारण नाहीं. काय वाटेल तें करून साखरेची निर्यात केलीच पाहिजे आणि अशी निर्यात करतांना साखर कारखान्यांना जो तोटा येईल तो सरकारनें भरून काढलाच पाहिजे इतकी बिकट परिस्थिति निर्माण झालेली नाहीं. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत साखरेच्या उत्पादनाचें लक्ष्य ३० लाख टनापासून ३५ लाख टनांपर्यंत वाढविण्यांत आलेलें आहे. ह्यांतहि कांहीं गैर नाहीं. भारतामधील साखरेचा वाढता खप व संभाव्य निर्यात लक्षांत घेतां दरसाल ३० लाख टन साखरेची विल्हेवाट लागेल आणि उरलेली ५ लाख टन साखर बिगर हंगामी कालांतील खपासाठी शिल्लक राहील. सध्याचे ३० लाख टनाचे उत्पादनच लक्षांत घेतलें तरी त्यामधील ५ ते ६ लाख टन साखर निर्यात करण्यांत येईल आणि बाकीची साखर देशांतर्गत खप व शिल्लकी साखर ह्यांच्यासाठी उपयोगी पडेल. मात्र शिल्लकी साखरेसाठी गुदामें बांधण्याची आवश्यकता आहे. भारताकडून २.२५ लाख टन साखर घेण्याचें अमेरिकेनें कबूल केलेलें आहेच. कदाचित् ह्याच वर्षी अमेरिका अधिक साखर खरेदी करण्याचा संभव आहे. पुढील वर्षी तर अमेरिका आपला खरेदीचा वांटा अधिक वाढवेल अशी अपेक्षा आहे. येत्या सप्टेंबर महिन्यांत इंटरनॅशनल शुगर कौन्सिलची बैठक जिनीव्हा येथें भरणार आहे. भारतामधील साखरेपैकीं १.५० लाख टन साखर अमेरिका सोडून इतर देशांत विकण्याची परवानगी कौन्सिलनें ह्या पूर्वीच दिलेली आहे. अमेरिकेबाहेरील देशांत आणखी साखर विकण्यास कौन्सिलकडून परवानगी मिळेल अशी आशा करण्यास हरकत नाहीं. देशांतील साखरेचा खप वाढविण्यासाठी काय करता येईल ह्याचाहि विचार करण्यांत येईल. साखरेच्या व्यापारावर व वहातुकीवर सध्यां जीं बंधनें आहेत तीं काढून टाकण्याची मागणी करण्यांत येत आहे. ह्या व्यापारांत जीं बंधनें अनावश्यक स्वरुपाची असतील आणि ज्यांच्यामुळें व्यापारांत निष्कारण अडथळे निर्माण होत असतील अशीं बंधनें व नियंत्रणें रद्द करण्यासंबंधीं राज्य सरकारांना सुचविण्यांत येत आहे. साखरेच्या जादा उत्पादनामुळें निर्माण झालेल्या अडचणींवर निर्यात हा एकच मार्ग आहे असें नाहीं. देशांतील साखरेचा खप वाढविण्यावर ह्यापुढें भर देण्यांत येईल आणि त्यासाठी जरूर ते उपाय लवकरच योजण्यांत येतील.

## स्टेट बँकेचा शाखावाढीचा कार्यक्रम

### नफ्यांत २५ ते ३०% वाढ

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सेंट्रल बोर्डाच्या सब कमिटीनें ( प्रा. द. गो. कर्वे त्या कमिटीचे अध्यक्ष होते ) सुचविलें होतें, कीं स्टेट बँक व तिच्या आठ सबसिडिअरी बँका ह्यांनीं मिळून जुलै, १९६० ते ३० जून, १९६५ ह्या पांच वर्षांत ३०० नव्या शाखा उघडाव्या. ह्या ३०० शाखांपैकीं १२० शाखा स्टेट बँक स्वत: उघडेल आणि बाकीच्या शाखा उघडण्याचें काम सबसिडिअरी बँकांकडे सोंपविण्यांत येईल. १९६१-६२ व १९६२-६३ ह्या वर्षी बँकेनें जरा विसावा घेऊन शाखावाढ पचवावी आणि पुढील दोन वर्षांत नव्या दमानें शाखावाढ करावी, असेंहि कर्वे कमिटीनें सुचविलें होतें. उदाहरणार्थ १९६१-६२ मध्यें ३०, १९६२-६३ मध्यें ४०, १९६३-६४ मध्यें ७० आणि १९६४-६५ मध्यें ८० शाखा उघडायला हरकत नाहीं. शाखाविस्ताराला आवश्यक असा अधिकारीवर्ग आणि नोकरवर्ग शिकवून तयार करण्याच्या योजना आंखण्यांत आल्या आहेत. १९६१ च्या पहिल्या सहामाहींत १९६० च्या पहिल्या सहामाहीपेक्षा २५ ते ३०% जास्त नफा बँकेला झाला आहे.

## स्वस्त औषधांची शिफारस करा

सुरत मेडिकल युनियनपुढें बोलतांना गुजरातचे मुख्यमंत्री डॉ. जीवराज मेहता म्हणाले कीं डॉक्टर लोकांनी आपल्या रोग्यांना शक्यतोंवर भारी किंमतींची औषधें घेण्याची शिफारस करूं नये. भारी किंमतीच्या औषधांची शिफारस करण्याची संवयच डॉक्टरसना लागलेली दिसते. अशा शिफारशीमुळें रोग्याला औषधांच्या जबर किंमतीबद्दल विवंचना वाटतेच. पण शिवाय सुचित औषध न घेतल्यास बरें न होण्याची भीतीहि त्याला पछाडते. डॉक्टरसनीं स्वस्त किंमतीच्या औषधाची शिफारस केल्यास पुष्कळ रोग्यांचा फायदा होईल.

## बँक ऑफ बरोडाची देणगी

बँक ऑफ बरोडा लि. नें पूरग्रस्तांसाठी २०,००० रु. ची देणगी दिली आहे. त्यांपैकीं १०,००० रु. प्राइम मिनिस्टर्स रिलीफ फंडाला दिले असून १०,००० रु. महाराष्ट्राच्या चीफ मिनिस्टर्स पूना रिलीफ फंडाला दिले आहेत.

## वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यांत येणारा मोठा पगार घटनेविरुद्ध आहे

### ऑडिटर जनरलची सरकारला सूचना

"इंडियन सिव्हिल सर्व्हिसला दिलेली हमी २६ जानेवारी, १९५० मध्यें संपुष्टांत आली. भारताची राज्यघटना अंमलांत आल्यानंतर निर्माण केलेल्या वरिष्ठ जागांवरील अधिकाऱ्यांना आय. ए. एस. मधील अधिकाऱ्यांना दिला जाईल, तेवढाच पगार मिळायला हवा" असें भारताचे कन्ट्रोलर व ऑडिटर जनरल श्री. ए. के. रॉय ह्यांनीं सरकारला कळविलें आहे. आयें. ए. एस. चा पगार आय. सी. एस. पेक्षा बराच कमी असतो. उदाहरणार्थ, जॉइंट सेक्रेटरीचें काम करणाऱ्या आय. सी. एस. ला दरमहा ३,००० रु. पगार दिला जातो, पण त्याच जागीं नेमलेल्या आय. ए. एस. ला २,२५० रु. पगार मिळतो. राज्यघटना अंमलांत आल्यानंतर कितीतरी नव्या वरिष्ठ जागा निर्माण करण्यांत आलेल्या आहेत; कांहीं नवीं खातींहि उघडण्यांत आलीं आहेत. ह्या नव्या वरिष्ठ जागीं नेमलेल्या अधिकाऱ्यांना आय. ए. एस. च्या श्रेणीचाच पगार दिला गेला पाहिजे, जास्त देतां येणार नाहीं, असें ऑडिटर जनरलचें म्हणणें आहे. त्यानें आपलें म्हणणें सरकारला कळविण्यापूर्वी ॲटर्नें जनरल ऑफ इंडियाचा सल्ला घेतलेला आहे. ऑडिटर जनरलची सूचना सरकारनें मान्य केली, तर कित्येक वरिष्ठ अधिकाऱ्यांचा पगार कमी होईल.

---

### ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयासाठी इमारत

अहमदनगर म्युनिसिपालिटीनें एक वर्षापूर्वी ऐतिहासिक वस्तूंचें जतन करण्यासाठी संग्रहालय स्थापन केलें होतें. आतां ह्या संग्रहालयासाठी नवी इमारत बांधण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. इमारतीसाठी ५०,००० रुपये खर्च येणार आहे. इमारतीला लागणाऱ्या जागेसाठी नगरच्या कलेक्टरच्या कचेरीजवळील ३० हजार चौरस फूट जागा महाराष्ट्र सरकारनें विनामूल्य दिली आहे. नगर जिल्ह्यांतील इतिहासप्रसिद्ध अनेक घराण्यांतून इतिहासाच्या अभ्यासासाठी उपयुक्त असे कागदपत्र होते, ते ह्या संग्रहालयांत ठेवण्यांत आले आहेत. त्याशिवाय इतिहासदृष्ट्या महत्त्वाच्या अशा इतर वस्तूहि संग्रहालयांत आहेत. गेल्या दोन वर्षांत नगर जिल्ह्यानें अल्पबचत योजनेंतील आपल्या लक्ष्यापेक्षाहि अधिक रक्कम जमा केली. त्याबद्दल जिल्ह्याला मिळालेल्या ३ लाख रुपयांच्या बक्षिसांपैकी ३५,००० रुपये महाराष्ट्र सरकार संग्रहालयाच्या इमारतीसाठी देणार आहे.

---

### कोळशाच्या खाणींच्या विकासासाठी तज्ज्ञ

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत भारतामधील कोळशाच्या खाणींचा विकास व विस्तार करण्यासाठी परदेशीय तज्ज्ञांची मदत घेण्यांत येणार आहे. अमेरिका, रशिआ, ब्रिटन, फ्रान्स, पश्चिम जर्मनी आणि पोलंड ह्या देशांतील तज्ज्ञ भारताच्या नॅशनल कोल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनला ह्या बाबतींत मदत करणार आहेत. कोळशाच्या नव्या खाणी चालू करणें आणि जुन्यांचा विस्तार करणें, ह्या मार्गानें कोळशाचें उत्पादन १ कोटी टनांपासून १·३० कोटी टनांपर्यंत वाढवितां येण्यासारखें आहे. तथापि खाणींतील वाहतुकीच्या व्यवस्थेची सुधारणा करूनसुद्धां कोळशाचें उत्पादन २० टक्के वाढवितां येईल असा अभिप्राय एका अमेरिकन खाणी तज्ज्ञानें व्यक्त केला आहे.

---

### पुरावरील नियंत्रण-योजनांचा विचार

मद्रास, ओरिसा, म्हैसूर आणि महाराष्ट्र राज्यांत नुकत्याच येऊन गेलेल्या महापुरांची व्याप्ति आणि कारणें ह्यांचा विचार करण्यासाठी नियोजन समितीची अनौपचारिक बैठक भरली होती. मध्यवर्ती सरकारच्या पाटबंधारे आणि वीजखात्याचे प्रतिनिधी निरनिराळ्या राज्यांतील पूरपरिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी धाडण्यांत आले होते. त्यांच्याकडून आलेल्या वस्तुस्थितिनिदर्शक अहवालांची माहिती समितीला देण्यांत आली. बैठकींत जलप्रलयाच्या सर्वसाधारण कारणांचा विचार करण्यांत आला. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत पूर-नियंत्रण योजनांसाठी ८० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. ह्या कामासाठी आणखी तरतूद केली जाण्याची शक्यता आहे. दरम्यान संबंधित राज्यांकडून पूर-नियंत्रणाच्या योजना मागविण्यांत आल्या आहेत.

---

### विविध-व्यवसायी शिक्षणसंस्था

सणसर येथील छत्रपति शिवाजी सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळानें सणसर येथें विविध व्यवसायांचें शिक्षण देणारी एक शाळा काढण्याचें ठरविलें आहे. ह्या नव्या शाळेसाठी २,५०,००० रुपये खर्च येणार असून तो महाराष्ट्र सरकार व कारखाना ह्यांनीं मिळून करावयाचा आहे. कारखान्यातर्फे सध्यां एक माध्यमिक शाळा चालविण्यांत येत आहे. तींत ४५० विद्यार्थी शिकत आहेत. शाळेंतील विद्यार्थ्यांकडून फी घेण्यांत येत नाहीं. नव्या शिक्षणसंस्थेला अद्याप कारखान्याच्या भागीदारांची संमति मिळावयाची आहे.

---

### नागपूरमध्यें व्यवसाय-कर

नागपूर कॉर्पोरेशननें व्यवसाय-कर बसविण्याचा निर्णय घेतला आहे. ज्यांचें वार्षिक उत्पन्न रु. ५,००० पेक्षा अधिक असेल त्यांच्याकडून तो घेण्यांत येणार आहे. कराची आकारणी करण्यासाठी प्राप्तीवरील कराच्या आकारणीचें सर्टिफिकेट करपात्रव्यक्तीला हजर करावें लागेल. ५ तें १० हजार रु. उत्पन्नाच्या व्यक्तीकडून ६५ ते ७५ रुपयांपर्यंत व्यवसाय-कर घेण्यांत येईल. त्यापुढील उत्पन्नाच्या गटाकडून प्रमाणशीर अधिक कर घेण्यांत येईल.

---

### मध्यप्रदेश सरकारची गव्हाची विक्री

मध्यप्रदेश सरकारनें आपल्या जवळील शिलकी गहूं किरकोळ व्यापाऱ्यांना व गहूं खाणाऱ्या गिऱ्हाइकांना विकण्याचें ठरविलें आहे. मात्र त्यांनीं किमान एक तरी पोतें गहूं घेतला पाहिजे अशी अट घालण्यांत आली आहे. गव्हाची किंमत सरकारनें ठरविलेली आहे. राज्य सरकारजवळ गेल्या शेतकी हंगामांतील १ लाख टन गहूं शिल्लक असून तो घाऊक व्यापाऱ्यांना देण्याचें सरकारनें पूर्वीच ठरविलें आहे. शिलकी गव्हाचा सांठा लवकर संपविण्यासाठी सरकारनें ग्राहकांना किंमतींत सूट देण्याचेंहि ठरविलें आहे.

---

**संयुक्त अरब प्रजासत्ताकाची अणुभट्टी**—संयुक्त अरब प्रजासत्ताक राज्यांत अणूंचें विच्छेदन करणारी पहिली भट्टी चालू करण्यांत आली आहे. ही भट्टी सोव्हिएट रशिआच्या सहकार्यानें बांधण्यांत आली आहे. अणुभट्टीचा उपयोग वैद्यकीय, शेतकीविषयक आणि औद्योगिक संशोधन करण्यासाठीं होणार आहे. अरब राष्ट्रें व आफ्रिकन राष्ट्रें ह्यामधील शास्त्रज्ञांना तिचा उपयोग करून घेतां येईल.

## तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचें स्वरूप

भारताची तिसरी पंचवार्षिक योजना दि. ७ ऑगस्ट रोजीं संसदेला सादर करण्यांत आली. राष्ट्रीय उत्पन्न दरवर्षी ५ टक्क्यां-हून अधिक वाढविणें आणि हा वेग चालू राहील ह्या दृष्टीनें भांडवल–गुंतवणुकीचा कार्यक्रम आखणें, अन्नधान्यांच्या बाबतींत स्वावलंबी होऊन उद्योगधंद्यांच्या व निर्यातीच्या गरजा भागविण्या-साठी इतर शेतकी उत्पादनांत वाढ करणें, शक्य तितक्या जास्त लोकांना रोजगार मिळवून देणें, आर्थिक सत्तेचें अधिक समान वाटप होण्याचा प्रयत्न करणें, हीं ह्या योजनेचीं प्रमुख उद्दिष्टें आहेत. शेतकी–उत्पादनांत ३०% वाढ, औद्योगिक उत्पादनांत ७०% वाढ, अन्नाच्या खपांत १०%, कापडाच्या खपांत ११%, अशी वाढ घडवून आणण्याचा प्रयत्न केला जाईल. सध्यां राष्ट्रीय उत्पन्नाच्या ११% रकमेची गुंतवणूक केली जाते. तें प्रमाण १४% वर नेलें जाईल; राष्ट्रीय उत्पन्नाच्या ८·५% बचतीऐवजीं ११·५% बचत आवश्यक होईल.

पहिल्या दोन योजनांच काळांत औद्योगिक उत्पादनाचा इंडेक्स ९४% वाढला, तरी शेतीचें उत्पादन त्यामानानें फारच कमी सुधारलें. अन्नधान्यें व औद्योगिक कच्चा माल ह्यांच्या किंमती त्यामुळें चढत गेल्या; अन्नधान्यांची एकसारखी आयात करावी लागली. तिसऱ्या योजनांत शेतीच्या उत्पादन वाढीला विशेष महत्त्व देण्यांत आलें आहे, तें योग्यच आहे. देशांतील बहुसंख्य लोक शेतीवर अवलंबून असतांना बिगर-शेतीच्या उत्पन्नावर कर लादण्याला मर्यादाच असणार, हें उघड आहे. लोकसंख्येची वाढ भरमसाट होत आहे आणि त्यामुळें उत्पादनवाढ अधिकाधिक लोकांवर विभागली जाऊन प्रत्येकाच्या पदरीं निराशाच येत आहे! बेकारीचा प्रश्न भेडसावीत आहे, तो सोडविण्यास शहरांत किती वाव उपलब्ध होणार? खेड्यापाड्यांतच नव्या संधि निर्माण होणें आवश्यक आहे. तुटीच्या अर्थव्यवस्थेचा अवलंब करावयाचा नाहीं म्हटलें तरी तो अटळ होत आहे, आणि त्याचे दुष्परिणाम सर्वांच्या अनुभवाचे आहेत. लोकशाही पद्धतीनें सत्वर उत्पादनवाढ घडवून आणणें केव्हांहि अवघडच असणार; त्यामुळें चलनी नोटा छापून प्रसृत करण्याचा मोह सरकारला होतो. त्याला आळा बसणें आवश्यक असलें तर त्याची शक्यता मात्र फारशी दिसत नाहीं. उत्पादनवाढीकडे लक्ष देत असतांना, तें खाऊन टाकणारी लोकसंख्येची वाढ काबूत ठेवण्याकडे पुरेसें लक्ष दिलें जात नाहीं; तें सोईचें वाटत नाहीं; ही मोठीच उणीव आहे. भारताला मदत करणारे परदेश ह्या गोष्टीकडे नेहेमींच आपलें लक्ष वेधीत असतात.

### उत्पादनाचीं कांहीं लक्ष्यें

| गट (१) | परिमाण (२) | १९६०-६१ (३) | १९६५–६६ (४) | टक्के वाढ (५) |
|---|---|---|---|---|
| शेतकी उत्पादनाचा निर्देशांक | १९४९=१०० | १३५ | १७६ | ३० |
| अन्नधान्यें | कोटी टन | ७·६ | १०·० | ३२ |
| पाटबंधाऱ्याखालील क्षेत्र | कोटी एकर | ७·०० | ९·०० | २९ |
| शेतकऱ्यांना कर्ज | कोटी रुपये | २०० | ५३० | १६५ |
| औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक | १९५०-५१=०१० | १९४ | ३२९ | ७० |
| गिरणीचें कापड | कोटी वार | ५१२·७ | ५८०·० | १३ |
| हातमागी, यंत्रमागी व खादी | कोटी वार | २३४·९ | ३५०·० | ४९ |
| अशुद्ध लोखंड | कोटी टन | १·०७ | ३·०० | १८० |
| द. कोळसा | कोटी टन | ५·४६ | ९·७० | ७६ |
| निर्यात | कोटी रु. | ६४५ | ८५० | ३२ |
| अन्नाचा खप | दरदिनीं दर माणशीं किती कॅलरी | २१०० | २३०० | १० |
| कापड | दर माणशी वार्षिक किती वार | १५·५ | १७·२ | ११ |

### आर्थिक तरतूद

| गट | दुसरी योजना एकूण खर्च | दुसरी योजना टक्के प्रमाण | तिसरी योजना एकूण खर्च | तिसरी योजना टक्के प्रमाण |
|---|---|---|---|---|
| (१) शेतकी व समाजविकास | ५३० | ११ | १०६८ | १४ |
| (२) मोठे व मध्यम पाटबंधारे | ४३० | ९ | ६५० | ९ |
| (३) वीज | ४४५ | १० | १०१२ | १३ |
| (४) ग्रामीण छोटे धंदे | १७५ | ४ | २६४ | ४ |
| (५) संघटित धंदे व खनिजें | ९०० | २० | १५२० | २० |
| (६) वाहतूक व दळणवळण | १३०० | २८ | १४८६ | २० |
| (७) सामाजिक सेवाकार्य व इतर | ८३० | १८ | १३०० | १७ |
| (८) इन्व्हेण्टरीज | — | — | २०० | ३ |
| एकूण | ४६०० | १०० | ७५०० | १०० |

### दुसऱ्या व तिसऱ्या योजनेंतील भांडवल–गुंतवणूक ( आंकडे कोटी रु. चे )

| गट | दुसरी योजना | | | | तिसरी योजना | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सरकारी २ | खाजगी ३ | एकूण ४ | टक्के प्रमाण ५ | सरकारी ६ | खाजगी ७ | एकूण ८ | टक्के प्रमाण ९ |
| १ शेतकी व समाजविकास | २१० | ६२५ | ८३५ | १२ | ६६० | ८०० | १४६० | १४ |
| २ मोठे व मध्यम पाटबंधारे | ४२० | — | ४२० | ६ | ६५० | — | ६५० | ६ |
| ३ वीज | ४४५ | ४० | ४८५ | ७ | १०१२ | ५० | १०६२ | १० |
| ४ ग्रामीण व छोटे धंदे | ९० | १७५ | २६५ | ४ | १५० | २७५ | ४२५ | ४ |
| ५ संघटित उद्योगधंदे व खनिजें | ८७० | ६७५ | १५४५ | २३ | १५२० | १०५० | २५७० | २५ |
| ६ वाहतूक आणि दळणवळण | १२७५ | १३५ | १४१० | २१ | १४८६ | २५० | १७३६ | १७ |
| ७ सामाजिक सुखसोयी व इतर | ३४० | ९५० | १२९० | १९ | ६२२ | १०७५ | १६९७ | १६ |
| ८ इन्व्हेण्टरीज | — | ५०० | ५०० | ८ | २०० | ६०० | ८०० | ८ |
| एकूण | ३६५० | ३१०० | ६७५० | १०० | ६३०० | ४१०० | १०४०० | १०० |

## लायसेन्स असलेल्या लहान–मोठ्या, एकाच जातीच्या बँकिंगचें बँकिंगक्षेत्र बनणार

### रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, श्री. अय्यंगार ह्यांचें भाषण

"लहान युनिट बँका आपल्या देशांत विशेषेंकरून यशस्वी झालेल्या नाहींत; त्यांतल्या कांहींचा कारभार ठीक चालला असून लायसेन्सलाहि त्या पात्र ठरल्या आहेत; हें मात्र खरें आहे."

"शेड्यूल्ड लायसेन्स्ड बँका, शेड्यूल्ड अन्–लायसेन्स्ड बँका, नॉन–शेड्यूल्ड लायसेन्स्ड बँका आणि नॉन–शेड्यूल्ड अन्–लायसेन्स्ड बँका, ह्या सर्वांची एकत्र बांधलेली मोट गोंधळ उत्पन्न करणारी असून ती टिकणें योग्य नाहीं. फक्त एकाच पद्धतीच्या —लायसेन्स मिळालेल्या बँका—आपल्याला हव्यात. सध्यां ज्या बँकांना लायसेन्स नाहीं, अशा बँका न उरणें दुर्दैवानें क्रमप्राप्तच होणार. बँकिंगच्या पुनर्रचनेची ही घटना संबंधित बँकांच्या भाग दारांना व डायरेक्टरांना पसंत न पडणें अगदीं शक्य आहे. पण जनतेला सहज समजेल व जिच्यावर तिचा पूर्ण विश्वास बसेल, अशी बँकिंगची पद्धत अल्पावधींत घडवून आणणें सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें आवश्यक आहे.

"ऑगस्ट, १९६० अखेर लायसेन्स्ड बँकांकडे एकूण ठेवीं-पैकीं ९४.७% ठेवी होत्या; अन्–लायसेन्स्ड बँकांकडे फक्त ५.३% ठेवी होत्या. बँकिंगच्या पुनर्घटनेचा संबंध ह्या ५.३% ठेवीपुरताच येतो; पण त्या धारण करणाऱ्या बँका मात्र पुष्कळ आहेत.

"पी. एल. ४८० फंड वगळले, तर शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी वाढतच आहेत, असें दिसून येईल.

| वर्ष | ठेवी |
|---|---|
| १९५६ | १०४७ कोटी रु. |
| १९५७ | ११८६ ,, |
| १९५८ | १३१८ ,, |
| १९५९ | १४७४ ,, |
| १९६० | १५६६ ,, |

"प्रत्येक वर्षाच्या पहिल्या सहामाहीचे आंकडे घेतले (पी. एल. ४८० फंड वगळून) तरी ठेवींतली वाढ स्पष्ट होईल :—

| पहिली सहामाही | ठेवींत वाढ |
|---|---|
| १९५६ | ५० कोटी रु. |
| १९५७ | ९२ ,, |
| १९५८ | ९७ ,, |
| १९५९ | ९१ ,, |
| १९६० | ९३ ,, |
| १९६१ | ९८ ,, |

"कडकपणा आणि समजूतदारपणा ह्यांच्या मिलाफानें बँकिंगची पुनर्घटना अल्पावधींत (म्हणजे दोन-तीन वर्षांत) घडवून आणणें शक्य होईल, आणि त्यायोगें डिपॉझिट इन्शुअरन्स योजनेंत येणाऱ्या, लायसेन्स असलेल्या; एकाच प्रकारच्या, मोठ्या व लहान बँकाच बँकिंगच्या क्षेत्रांत राहतील."

**यांत्रिक अवजारांचा कारखाना**—भारतामधील यांत्रिक अवजारांचा तिसरा कारखाना पंजाबांत कालका गांवापासून तीन मैलावर असलेल्या एका गांवीं काढण्यांत येणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठीं ८ ते १० कोटी रुपये भांडवल लागेल. पंजाब सरकार ७०० एकर जागा उपलब्ध करून देणार असून पूर्व जर्मनीचें सरकार तांत्रिक साह्य देण्यास तयार आहे.

### औद्योगीकरणाच्या मार्गावरील महत्त्वाचें पाऊल

भारताच्या औद्योगीकरणाच्या कार्यक्रमांतील एक महत्त्वाचें पाऊल लवकरच टाकलें जाणार आहे. रांचीजवळ हटिआ ह्या ठिकाणीं अवजड यंत्रसामग्री तयार करण्याचा कारखाना रशिआच्या मदतीनें काढण्यांत येणार आहे. त्याच्या बांधकामाला मोठ्या प्रमाणावर सुरुवात करण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें ओतकामाची भट्टी उभारण्याचें कामहि सुरू करण्यांत येणार आहे ओतकामाची भट्टी झेकोस्लोव्हाकिआच्या साह्यानें उभारली जात आहे. भारी यंत्रसामग्रीच्या कारखान्यांत १० लाख टन पोलाद निर्माण करणाऱ्या पोलादाच्या कारखान्याची बहुतेक सर्व यंत्रसामग्री बनविण्यांत येईल. खताच्या व इतर कारखान्यांना लागणारी जड वजनाची यंत्रसामग्रीहि कारखाना तयार करील. भारी यंत्रसामग्रीचा कारखाना २ टप्प्यांत बांधण्यांत येणार आहे. १९६४ च्या अखेरीस तो सुरू होण्याची शक्यता आहे. पहिला टप्पा पुरा झाला म्हणजे ४५,००० टन वजनाची यंत्रसामग्री तयार होऊं लागेल. दुसरा टप्पा पूर्ण झाल्यावर ८०,००० टन वजनाची यंत्रसामग्री तयार होऊं लागेल. सार्वजनिक मालकीच्या विभागांत स्थापन करण्यांत आलेल्या तीन पोलादाच्या कारखान्यांतहि ह्या कारखान्याकडून यंत्रसामग्री मिळण्याची शक्यता आहे. कारखान्याच्या उभारणीच्या कामाबरोबरच ते चालविण्यासाठीं लागणारा कुशल कामगारवर्ग व तंत्रज्ञ शिकवून तयार करण्यांत येतील. ह्या लोकांचें शिक्षण देशांतील व परदेशांतील कारखान्यांत होणार आहे. शिक्षणासाठीं रांची येथें एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या केंद्रांत २०० दुय्यम श्रेणीचे अधिकारी आणि ८०० कामगार ह्यांच्या शिक्षणाची सोय होईल. त्याशिवाय रशिआ व झेकोस्लोव्हाकिआ ह्यांमधील कारखान्यांमधून सुमारें ७५० जणांना शिक्षण देण्यांत येईल.

### चांदा जिल्ह्यांतील लोखंडाचा कारखाना

महाराष्ट्रांतील चांदा जिल्ह्यांत बिडाचें लोखंड तयार करण्याचा एक कारखाना स्थापन करण्यांत येणार आहे, अशी माहिती राज्य-सरकारचे इमारती व दळणवळण खात्याचे मंत्री श्री. कन्नमवार ह्यांनीं जाहीर केली आहे. कारखान्याच्या उभारणीसाठीं १५ कोटी रुपये खर्च येणार आहे. कारखान्यासाठीं लागणारी जागा निवडण्यासाठीं जर्मन तज्ज्ञांचें एक मंडळ लवकरच भारतांत येणार आहे. चांदा येथें सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारी एक औद्योगिक वसाहतहि स्थापन करण्यांत येणार आहे. वसाहतीसाठीं ६ लाख रुपये भांडवल लागणार आहे. ह्या कामासाठीं एक तात्पुरती कमिटी स्थापन करण्यांत आली असून आतापर्यंत १,०४,००० रुपयांचें भांडवल जमा करण्यांत आलें आहे. आणखी ४०,००० रुपयांचें भांडवल लवकरच गोळा होईल.

### बँकांना चोऱ्या होणें परवडतें!

चोऱ्या व दरोडे ह्यांवर प्रतिबंधक उपाय योजण्याकडे ब्रिटिश बँका दुर्लक्ष करतात, अशी तक्रार केली जाते. ती तक्रार कांहीं खोटी नाहीं; त्या दुर्लक्षाचें समर्थन एका बँक-अधिकाऱ्यानें पुढील-प्रमाणें केलें आहे :—"शेंकडों शाखा असलेल्या मोठ्या बँकेनें चोरी-दरोड्यांवर अद्ययावत् उपाययोजना करायची म्हटलें, तर त्याला प्रचंड खर्च येईल. समजा, तो ५० लक्ष रु. आला. पण प्रत्यक्ष चोऱ्यांमुळें, अगदीं ॲक्चुअरीच्या शास्त्राप्रमाणें, नुकसान येईल फार तर दरसाल ३ लक्ष रुपये! समजलें का आतां आम्ही कसे व्यवहारी आहोंत तें!"

### बँकांच्या मजबुतीसाठी नव्या बंधनांचा स्वीकार

बँकांचें वसूल भांडवल, रिझर्व्हज्, कॅश रिझर्व्हज् आणि लिक्विडिटी ह्या संबंधांतील मजबुती वाढविण्यासाठी रिझर्व्ह बँकेनें केलेल्या सूचनांचा विचार करण्यासाठी देशांतील प्रमुख बँकर्सची अनौपचारिक सभा मुंबई येथें इंडियन बँक्स असोसिएशनच्या विद्यमानें दोन दिवस भरली होती. रिझर्व्ह बँकेच्या सूचनांना, कांहीं तपशील सुधारून, मान्यता देण्याचें बँकर्सनीं ठरविलें आणि सूचना अमलांत आणण्यासाठीं कांहीं वर्षांच्या अवधीची जरूरी प्रतिपादन केली. ठेवींच्या ५ इतकें वसूल भांडवल व रिझर्व्ह असले म्हणजे पुरें, असें बँकर्सचें मत पडलें. रिझर्व्ह बँकेची सूचना ७½% होती. कराची तरतूद करण्यापूर्वीच्या नफ्याच्या २०% ऐवजीं करानंतरचा २०% नफा रिझर्व्हमध्यें टाकावा लागावा, असेंहि मत पडलें. लिक्विडिटीचें सध्यांचें प्रमाण २०% आहे, तें २७½% ऐवजीं २५% केलें जावें, असेंहि बँकर्सचें म्हणणें आहे. रिझर्व्ह बँकेकडील सक्तीच्या ठेवींवर बँकांना व्याज मिळावें, असा त्यांचा आग्रह आहे. ह्या ठेवींचें एकूण ठेवींशीं प्रमाण मध्यां ३·७% पडतें, तें ५% केलें तरी चालेल; पण त्यावर ४% व्याज मिळावें, असें बँकर्सचें म्हणणें आहे.

---

### अंतराळ प्रवासांतील यशाचें मूल्यमापन

पृथ्वीभोंवतीं सोडलेल्या अग्निबाणांत बसून पृथ्वीला २५ फेऱ्या मारून मेजर टिटोव्ह हा रशिआचा दुसरा अंतराळ प्रवासी सुखरूप परत आला. ह्या यशाचें मूल्यमापन करतांना अमेरिकन शास्त्रज्ञांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, रशिआनें अग्निबाणशास्त्रांत केलेली आश्चर्यकारक प्रगति तर त्यामुळें सिद्ध होतेच. पण त्याशिवाय शरीरव्यापारशास्त्र व मानसशास्त्र ह्या शास्त्रांतील रशिआच्या प्रगतीचाहि तो पुरावा आहे. वजनरहित अवस्थेंत पृथ्वीभोंवतीं फिरतांना मेजर टिटोव्हच्या शरीरावर व मनावर खूप ताण पडला असला पाहिजे. तो सहन करून मेजर टिटोव्ह खाणें, झोपणें व अग्निबाणावर नियंत्रण ठेवणें ह्या क्रिया करूं शकत होता. ह्यापूर्वी अंतराळ प्रवास करून आलेल्या दोघा प्रवाशांपेक्षा टिटोव्ह ह्याचें यश फार पुढच्या टप्प्याचें आहे.

---

### पलाई बँकेचे नोकर

लिक्विडेशनमध्यें गेलेल्या पलाई बँकच्या १६५ नोकरांना इतर बँकांत नोकरी देण्यांत आली आहे. बँकेच्या ऑफिशिअल लिक्विडेटरच्या हाताखाली १५५ नोकर आहेत, त्यांपैकी ८५ नोकर पूर्वी पलाई बँकेंत होते.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★



तार : सेन्को बँक     दूरध्वनि : १४८१

स्वतंत्र भारताचा १३ वा वाढदिवस, आपण उत्साहानें साजरा करूं.

पण त्याचबरोबर स्वतंत्र भारताची पुढली वाटचाल अधिक यशस्वी करण्याकरतां आपलें आर्थिक बळ एकवटण्याचाहि निश्चय करूं.

संपन्न भारताच्या निर्मितीसाठी आमची सहकारी बँक सतत निष्ठापूर्ण सेवा करीत आहे.

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

लक्ष्मी पथ, पुणें २.

★ भाग भांडवल : ४१ लाखांचे वर ★ खेळतें भांडवल : ६॥ कोटींचे वर

★ ठेवी : ३॥ कोटींचे वर ★ सव्वीस शाखा व उपशाखा

आणि ★ सुरक्षित ठेवघरें

वा. ग. अळतेकर
कार्यकारी संचालक

शि. म. काळे
अध्यक्ष

## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

बचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग्ज | व्याजाचा दर २॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | „ ३। „ |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | „ ५ „ |

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

---

भारतांतील प्रमुख नागरी सहकारी बँक

## दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

[ *टेलि. : २७०१४* सारस्वत बँक-गृह, मुंबई ४ [ स्थापना : १९१८

| | | | | लाख |
|---|---|---|---|---|
| शेअर भांडवल : | ... | ... | रु. | १०·०० |
| वसूल भांडवल | ... | ... | रु. | ८·९१ |
| रिझर्व्ह व इतर फंडस् : | ... | ... | रु. | १०·६० |
| ठेवी : | ... | ... | रु. | ६५१·७२ |
| खेळतें भांडवल : | ... | ... | रु. | २८०·८८ |

शाखा : *फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव.*

*महिला शाखा :* सारस्वत बँक-गृह, निकदवारी लेन, मुंबई ४.

---

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड.

९८०, सदाशिव पेठ, लक्ष्मी पथ, पुणें २.

ना तरी इक्षुदंडु । पाळितया गोडु ॥
गाळितया कडु । नोहेंचि जेवीं ॥ श्रीज्ञानेश्वरी

गेल्या हंगामांत कंपनीनें एकूण दोन लक्षांचेवर साखर पोत्यांचें उत्पादन करून भारतीय

### स्वातंत्र्याचा गोडवा वाढविला !

भारताच्या स्वातंत्र्यासाठीं कष्ट केलेल्या

**सर्व वीरांना शतशः प्रणाम असोत !**

### स्वतंत्र भारत चिरायु होवो !

के. व्यं. चांफेकर,
बी. ई., ए. एम. आय. ई.,
मॅनेजर.

शं. ल. लिमये,
बी. एस्सी., एलएल. बी.,
अध्यक्ष.

### रस्त्यावरील अपघातांत होणारे मृत्यू

युरोपिअन इकॉनॉमिक कमिशन ह्या संघटनेचा ताजा अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. ह्या अहवालांत युरोपमधील रस्त्यांवर होणाऱ्या अपघातांत दगावलेल्या लोकांसंबंधीं देशवार माहिती देण्यांत आली आहे. कोठल्याहि प्रगत भूभागांत रेल्वेबरोबरच रस्त्यावरील वहातुकीची वाढ होत जाणें अपरिहार्य असतें. तशी ती पश्चिम युरोपांतील देशांतहि झालेली आहे. पण, रस्तावाहतुकीच्या वाढीबरोबरच रस्त्यावर होणाऱ्या अपघातांची संख्याहि वेगानें वाढत असल्याचें अहवालांतील माहितीवरून दिसून येतें. अपघात पायी चालणाऱ्याच्या चुकांमुळें होतात कां वाहन हाकणाऱ्याच्या चुकीमुळें होतात, हा प्रश्न वेगळा, पण ते होतात आणि थोड्याशा काळजीपूर्वक वागणुकीमुळें ते टाळतां येण्यासारखे असतात असें तज्ज्ञांचें मत आहे. १९५३ सालीं पश्चिम युरोपांतील १६ देशांत मिळून जे रस्त्यावरील अपघात झाले त्यांत ३६,२९४ माणसें दगावलीं आणि ९,४१,९०० माणसें जायबंदी झालीं. १९५९ सालामधील हेच आंकडे अनुक्रमें ४६,६०० व १३,८३,००० असे आहेत. १९६० सालाचे फ्रान्स, ब्रिटन व पश्चिम जर्मनी ह्या देशांसंबंधींचे आंकडे पाहिले तरीहि अपघातांच्या संख्येंत वाढ झाल्याचेंच दिसून येतें. १९६० सालीं फ्रान्समध्यें रस्त्यावरील अपघातांत ८,२९५ माणसें ठार झालीं आणि १,८५,०३१ जखमी झालीं. पश्चिम जर्मनींत ह्याच वर्षी १४,०१८ माणसें दगावलीं आणि ४,३६,१०० जखमी झालीं. ब्रिटनमध्यें ६,९७० माणसें रस्त्यावरील अपघातांत सांपडून ठार झालीं. भारतामध्येंहि रस्तावाहतुकीचे रस्ते वाढत आहेत. ह्या वाढत्या वाहतुकीबरोबरच अपघातांचें प्रमाणहि वाढत जाणार असेल तर ही बाब चिंतेची होऊन राहील. युरोपांतील देशांच्या रस्तावाहतुकीच्या अनुभवावरून भारताला कांहींतरी खास शिकतां येईल.

### अणुशक्तीसाठी लागणाऱ्या इंधनाचा कच्चा माल

हिंदमधील औद्योगीकरणाची जसजशी प्रगति होत जाईल तसतशी देशांतील औद्योगिक शक्तीची मागणी वाढणार आहे. औद्योगिक शक्ति निर्माण करण्यासाठी लागणारा दगडी कोळसा अगर जलविद्युत् प्रत्येक ठिकाणीं निसर्गत:च उपलब्ध असत नाहीं. ह्या दृष्टीनें पहातां तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत अणुशक्तीसाठी लागणाऱ्या इंधनासंबंधीं देण्यांत आलेली माहिती उत्तेजक आहे. अणुशक्ति निर्माण करण्यासाठी थोरिअम ह्या खनिजाचा कच्चा माल म्हणून उपयोग करण्यांत येतो. ह्या खनिजाचा सगळ्यांत मोठा सांठा भारताजवळ आहे. औद्योगीकरणाचा वेग वाढेल त्या मानाने अणुशक्तीचा भारताला अधिकाधिक उपयोग करून घ्यावा लागणार आहे. कारण, कोळसा व जलविद्युत् ह्यांचें उत्पादन वाढलें तरीहि तें औद्योगिक शक्तीची वाढती गरज भागवूं शकणार नाहीं. अणुशक्तीच्या बाबतींत स्वयंपूर्ण होण्यासाठी भारताला अणुइंधनाच्या कच्च्या मालाची शाश्वति वाटावयास पाहिजे. सुदैवानें कच्चा माल भरपूर प्रमाणांत उपलब्ध आहे. मद्रास व केरळ राज्यांतील समुद्रकिनाऱ्यावर मोनाझाइट वाळू विपुल प्रमाणावर सांपडते. ह्या वाळूचा उपयोग अणुइंधन तयार करण्यासाठी होतो. मद्रास व केरळ राज्यांतील अशा प्रकारच्या वाळूचा सांठा २ लाख टनांच्या आसपास आहे. ह्याशिवाय इतर राज्यांतूनहि अणुखनिजें शोधण्याचा प्रयत्न चालू होता. ह्या प्रयत्नाला यश आलें आहे. बिहार राज्यांत थोरियममिश्रित वाळूचा आणखी सांठा सांपडला आहे. तो सुमारें ३ लाख टन असावा. त्याशिवाय युरेनिअममिश्रित मातीचाहि शोध करण्यांत येत आहे. देशाच्या अनेक भागांत अशी माती सांपडली आहे. खुद्द बिहारमध्येंच युरेनिअममिश्रित हजारों टन माती सांपडली असून ती खणण्यासाठी खाणी खोदण्यांत येत आहेत. ह्या खाणीमधून रोज १ हजार टन माती काढण्यांत येईल.

### व्यक्ती आणि संचालकत्व

पश्चिम आणि मध्य भारतांतील ११७ मोठ्या कंपन्यांची पहाणी करतां असें आढळलें, कीं त्या ११७ कंपन्यांत डायरेक्टरांच्या एकूण ९१७ जागा आहेत, आणि त्या ५४८ जणांनीं व्यापल्या आहेत. तेच ५४८ जण इतर १,९०५ कंपन्यांत ४,१७४जागांवर कामें करीत आहेत. सबंध भारताचे आंकडे पाहिले, तर प्रत्येक डायरेक्टर आणखी ७ कंपन्यांत ( म्हणजे एकूण आठ ठिकाणीं ) डायरेक्टर असतो. फक्त ११३ लोक एकाच कंपनींत डायरेक्टर आहेत; २९४ लोक २ ते १० कंपन्यांत डायरेक्टर आहेत; ९५ लोक ११ ते २० कंपन्यांत डायरेक्टर आहेत आणि ४४ लोक २१ किंवा त्यापेक्षा जास्त कंपन्यांत डायरेक्टर म्हणून काम करीत आहेत. एकदां एखादा मनुष्य एका कंपनींत डायरेक्टर झाला, तर तेवढ्यावर तो समाधान मानीत नाहीं; अधिकाधिक कंपन्यांतून तो डायरेक्टर होऊं इच्छितो, असें ह्यावरून दिसून येतें.

**सूडानला रशिआची मदत**—सूडानच्या सरकारला रशिआने २ कोटी रूबल्सचें कर्ज मंजूर केलें आहे. ह्या कर्जाचा विनियोग सूडानचें सरकार निरनिराळ्या औद्योगिक विकास कार्यासाठी करणार आहे. कर्जाची मुदत १२ वर्षांची असून त्यावर अडीच टक्के व्याज घेण्यांत येणार आहे. रशिआकडून मिळणारी यंत्रसामुग्री आल्यावर एक वर्षांत कर्जाच्या परतफेडीस प्रारंभ होणार आहे.

## Co-operation and Accountancy Diploma Board, Poona 1.

The under-mentioned candidates are hereby declared by the Co-operation and Accountancy Diploma Board to have passed the G. D. C. & A. Examination held in the month of April 1961.

### POONA CENTRE

(1) Passed in the whole Examination including those who have passed in one or the other part previously.

**Second Class :** K. D Joshi.

**Pass Class :** J. S. Deshpande, V. A. Joshi, B. B. Kole, Kum. M. M. Kenjalkar, A. V. Mangalwedheker, P. P. Dharmadhikari, R. B. Deshpande, D. R. Jedhe, B. N. Mujawar, M. P. Mahajan, M. C. Thakkar.

**(2) Passed in " Co-operation Group " only.**

D. P. Aphale, V. G. Bhate, A. G. Kelkar, D. G. Khondre, J. M. Karne, P. N. Kolte, V. T. Kumbhojkar, N. R. Patil, S. E. Palwe, S. N. Sathe, S. V. Barve, N. W. Deshmukh, V. S. Khanwelkar, B. D. Mahajan, B. R. Napate, A. S. Patil, M. N. Pandhre, A. S. Suktanker, A. D. Wasave.

**(3) Passed in " Accounting Group " only**

N. P. Barabde, R. B. Kulkarni, G. P. Oak.

**(4) Passed in " Banking Paper " only**

Nil

**Sd/- L. N. Bongirwar.**
Registrar and Chairman.

**मॉस्कोंत बंगाली चित्रपट**—मॉस्को येथें भरविण्यांत आलेल्या चित्रपट महोत्सवांत पंथेर पांचाली हा चित्रपट दाखविण्यांत येणार आहे. चित्रपट पहाण्यासाठी खास प्रवेशपत्रिका देण्यांत आली आहे. मूळ बंगाली बोलपटाला इंग्रजी भाषेंतील कथनाची जोड दिलेली एक प्रत मॉस्कोला विमानानें नेण्यांत आली आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक श्री. सत्यजित रॉय मॉस्कोंत हजर राहणार आहेत.

**ग्रामीण भागांतील वीजपुरवठा**—महाराष्ट्र सरकार आणि जागतिक बँकेचे प्रतिनिधी ह्यांच्या दरम्यान महाराष्ट्रांतील ग्रामीण भागांतील वीजपुरवठ्याच्या प्रश्नाबद्दल चर्चा करण्यांत आली. कोयना योजना व ग्रामीण भागांतील वीज पुरवठ्याच्या योजना ह्या कामासाठी महाराष्ट्र सरकारनें जागतिक बँकेकडे कर्जाची मागणी केलेली आहे.

**सरकारी नौकरांच्या मुलांची सोय**—मध्यवर्ती सरकारच्या ज्या नौकरांची बदली एका राज्यामधून दुसऱ्या राज्यांत होण्यासारखी असेल अशा नौकरांच्या मुलांसाठी देशभर शाळा स्थापन करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. ह्या शाळांतून शिक्षणाचें माध्यम इंग्रजी असेल. निरनिराळ्या राज्यांतून हळूहळू प्रांतीय भाषांतून सर्व शिक्षण देण्यांत येऊं लागल्यामुळें हा उपक्रम करण्यांत येणार आहे.

**रशिआच्या संरक्षण खर्चांत वाढ**—रशिआनें आपल्या संरक्षण खर्चांत ३०० कोटी रुबल्सची वाढ केली आहे. आतां संरक्षणखात्याचा एकूण खर्च सुमारें १२४० कोटी रुबल्स झाला आहे. ही वाढ लक्षांत घेऊनहि रशिआच्या संरक्षणखात्याचा खर्च अमेरिकेच्या संरक्षणखात्याच्या खर्चापेक्षा एक तृतियांशापेक्षा कमी असेल. ब्रिटनच्या खर्चापेक्षा तो दुप्पट असेल.

**निर्वासितांसाठी वसाहत**—पूर्व पाकिस्तानांतून आलेल्या निर्वासितांसाठी एक वसाहत स्थापन करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. वसाहतीसाठी दिल्लीजवळ २२० एकर जागा मिळविण्यांत आली आहे. वसाहतीसाठी ३५ लाख रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. २०० ते ८०० चौरस वारांचे १,६०० प्लॉटस पाडण्यांत आले असून दिल्लीच्या आसपास उद्योगधंदा अगर नौकरी करणाऱ्या निर्वासितांना ते देण्यांत येतील.

**पोलाद मुबलक मिळणार**—भारताचे व्यापार व उद्योगमंत्री श्री. के. सी. रेड्डी हैदराबाद येथें बोलतांना नुकतेंच म्हणाले कीं भारतांत पोलादाचा सुकाळ होण्याचे दिवस जवळ आले आहेत. पोलादाची आयात दरसाल कमी करण्यांत येत आहे. दुर्गापूर, भिलई, रुरकेला, येथील कारखान्यांतून उत्पादन पूर्वतया होऊं लागलें कीं भारत पोलादाची निर्यात सुद्धां करूं शकेल.

**मंगलोर येथें खताचा कारखाना**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत मंगलोर येथें सार्वजनिक मालकीचा एक खताचा कारखाना काढण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. कारखान्यासाठी लागणारा कांहीं कच्चा माल मुंबईहून समुद्रमार्गे आणण्यांत येणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी लागणाऱ्या परदेशीय चलनाबाबत अडचण येणार नाहीं.

**इराकसाठी रेडिओ स्टेशन**—इराकमध्यें, सर्व जगभर ऐकूं जाईल असें मोठें रेडिओ स्टेशन रशिआच्या मदतीनें उभारण्यांत आलें आहे. स्टेशनाचें उद्घाटन नुकतेंच करण्यांत आलें. त्याच्या उभारणीसाठी ४० लाख डॉलर्स खर्च आला असून रशिआच्या तंत्रविद्येचें एक अभिमानास्पद प्रतीक म्हणून तें मानण्यांत येत आहे. इराकमधील क्रांतीच्या तिसऱ्या वर्षदिनीं तें चालू करण्यांत आलें.


# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

स्थापना : १९११

टेलिफोन, नं. २५५४७४-७५ | पोस्ट बॉक्स नं. ७७२ तारेचा पत्ता—कामर्सबँक

मुख्य कचेरी— ९, बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई

चेअरमन : श्री. प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. | १ कोटी, ४५ लक्ष |
| गंगाजळी व फंड | रु. | ७२ ,, |
| ठेवी | रु. | १४ कोटी, १६ लक्ष |
| खेळतें भांडवल | रु. | २७ कोटी |

महाराष्ट्र राज्यांतील, शाखा व संलग्न बँका ३०४

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीसाठी चौकशी करावी.

चिं. द. दाते,
कार्यकारी संचालक.



टेलिफोन नं. २४८३. तार :

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड,

लक्ष्मी पथ, पुणें शहर.

इकडे वेळींच लक्ष द्या.........

आकर्षक व्याजाच्या दरानें आपला पैसा सहकारी बँकेंत गुंतवून निश्चिंत रहा.

दिनांक १ एप्रिल, १९६१ पासून आमचे बँकेनें कायम व सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचे दरांत वाढ केली आहे.

| कायम ठेव | | | व्याजाचे नवीन दर |
|---|---|---|---|
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षे | ... | ... | ४। टक्के |
| ३ वर्षे | ... | ... | ४॥ टक्के |
| सेव्हिंग्ज ठेव | ... | ... | २॥ टक्के |

या खेरीज शॉर्ट टर्म व कॉल डिपॉझिट्सवरील व्याजाचे दराबाबत चौकशी करणेसाठी कार्यकारी संचालक यांना बँकेचे वेळेंत समक्ष भेटा. संबंधी सर्व माहिती ते आनंदानें पुरवतील.

बा. ग. अळतेकर, बी. कॉम., कार्यकारी संचालक.

शि. म. काळे, एम्. एल्. ए. अध्यक्ष.

**कागदाच्या धंद्याचा विकास**—भारतामधील कागदाच्या कारखान्यांतून मुख्यतः छापण्याच्या व लिहिण्याच्या कागदाचें उत्पादन करण्यांत येतें. पण आतां हळूहळू इतर उपयोगासाठी लागणारा कागद तयार होऊं लागेल. ह्या कामीं कच्चा माल म्हणून उसाच्या चिपाडांचा उपयोग करण्यांत येणार आहे. इतर देशांतील कागदाच्या धंद्याचा अभ्यास करण्यासाठी एक मंडळ लवकरच जाणार आहे.

**अंतरिक्ष प्रवासांतील पुढचें पाऊल**— गेल्या एप्रिलमध्यें पृथ्वी-भोंवतीं भ्रमण करून आलेले पहिले अंतरिक्ष प्रवासी युरी गागारिन वॉर्सा येथील युवकांच्या मेळाव्यांत बोलतांना म्हणाले कीं, रशियन शास्त्रज्ञ दूरच्या ग्रहावर जाण्यास उपयोगी पडतील असे अधिक जोरदार अग्निबाण तयार करण्यांत गुंतले आहेत. अंतरिक्ष प्रवासांतील रशियाचें पुढचें पाऊल पहिल्यापेक्षाहि दूरगामी राहील. तथापि अजून पुष्कळ तांत्रिक प्रश्न सुटावयाचे आहेत.

**सिने-कामगारांना फायदा**—भारत सरकारच्या मजूरखात्यानें १९५२ चा एम्प्लॉयीज प्रॉव्हिडंट फंड कायदा सीनें-कामगारांना लागू करण्याचें ठरविलें आहे. हा कायदा त्यांच्या बाबतींत ३१ जुलैपासून अंमलांत आणण्यांत येईल. सिनेमागृहें, स्टुडिओ, चित्रपट निर्माण करणाऱ्या संस्था, चित्रपटांचें वितरण करणाऱ्या संस्था, इत्यादींना तो लागूं होईल. मात्र अशा संस्थांतून काम करणाऱ्या कामगारांची संख्या २० अगर अधिक असली पाहिजे.

**मोठ्या शहरांतील पुरुषांची अधिक संख्या**—कलकत्ता शहरांत दर १,००० स्त्रियांमागें पुरुषांची संख्या १,७५४ इतकी आहे. त्याच्या खालोखाल मुंबई शहरांत दर १,००० स्त्रियांमागें पुरुषांची संख्या १,६६६ आहे. जमशेटपूरमध्यें मात्र दर १,००० स्त्रियांमागें पुरुषांची संख्या १,२५० आहे. मोठ्या शहरांत कामधामासाठी येणारे पुरुष आपल्या बायका गांवींच ठेवून येतात, त्याचा हा परिणाम असावा.

**दार्जिलिंग भागांत नवे कारखाने**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सिलिगुरी ह्या ठिकाणीं एक सहकारी साखर कारखाना काढण्याचें पश्चिम बंगाल सरकारनें ठरविलें आहे. ह्याच कारखान्यांतील उसाच्या चिपाडाचा उपयोग करून कागदाची एक गिरणी काढण्याचाहि सरकारचा विचार आहे. त्याशिवाय ५ लाख रुपये खर्चून ह्या भागांत एक औद्योगिक वसाहत स्थापन करण्यांत येईल.

**भाक्रा धरणाची प्रगति**—भाक्रा धरणाची उंची आतां पायापासून ६४२ फूट झाली आहे. चालू वर्षअखेर धरणाची ७४० फुटांची संकल्पित उंची पूर्ण होईल. धरणासंबंधीं सल्ला देणाऱ्या तज्ज्ञांनीं १९६१ च्या पावसाळ्यांत धरणामागील गोविंदसागर तलावांत पाणी अडविण्याची सूचना केली होती. पाणी अडविण्यासाठी जरूर असणारीं सर्व कामें झालीं असल्यानें ह्या वर्षी तलावांत पाणी सांठविण्यास प्रारंभ होईल.



## कंपनी कायद्याचीं कलमें – ३२ आणि १३३ ( ३ )

### सुप्रीम कोर्टाचा निवाडा

बंधनराम भंडारी आणि इतर कांहीं इसम हे हिरजी मिलचे डायरेक्टर होते. त्यांचेवर पहिला आरोप असा होता कीं, १९१३ च्या कंपनी कायद्याच्या क. ३२ खालीं कंपनीच्या हिस्सेभांडवलाचा गोषवारा रजिष्ट्रारला पाठवावा लागतो हें माहीत असूनसुद्धां जाणून-बुजून त्यांनीं तो गोषवारा रजिष्ट्रारला पाठविला नाहीं. दुसरा आरोप असा होता कीं, कंपनी कायद्याच्या क. १३१ खालीं कंपनीच्या सर्वसाधारण सभेंत कंपनीच्या नफ्यातोट्याचा बॅलन्स-शीट सभेपुढें मांडावयाचा असतो तो त्यांनीं मांडला नाहीं.

प्रस्तुत मामल्यांत कंपनीची सर्वसाधारण सभा भरविण्यांत आलीच नव्हती. सर्वसाधारण सभा झालीच नसल्यामुळें क. ३२ आणि १३३ ( ३ ) खालील गुन्हे होऊच शकत नाहीं या सबबीवर चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनें वरील डायरेक्टर लोकांना निर्दोष म्हणून सोडून दिले. यावर तेव्हांच्या मुंबई राज्य सरकारनें मुंबई हायकोर्टात अपील केलें. परंतु तें अपील फेटाळण्यांत आल्यामुळें मुंबई राज्य सरकारनें सुप्रीम कोर्टाला अपील केलें.

कंपनी कायद्याच्या क. ३२ (१) मध्यें असें म्हटलें आहे कीं, कंपनीच्या पहिल्या सर्वसाधारण सभेच्या तारखेला कंपनीचे एकंदर जेवढे शेअर–होल्डर असतील तेवढ्यांची यादी कंपनीनें तयार केली पाहिजे. कलम ३२ (२) मध्यें असें म्हटलें आहे कीं, त्या पोट-कलमांत नमूद केलेल्या तपशीलाचा गोषवारा त्या यादींत असला पाहिजे. कलम ३२ (३) मध्यें असें म्हटलें आहे कीं, सर्वसाधारण सभा ज्या तारखेला भरली त्या तारखेपासून २१ दिवसांचे आंत वरील यादी आणि गोषवारा पूर्ण करण्यांत आला पाहिजे, आणि त्याची नक्कल रजिष्ट्रारकडे ताबडतोब पाठविण्यांत आली पाहिजे. असें करावयास चुकल्यास क. ३२ (५) खालीं शिक्षा सांगण्यांत आली आहे. आरोपी डायरेक्टर लोकांतर्फे असा युक्तिवाद करण्यांत आला कीं, कंपनीची सर्वसाधारण सभा झालीच नसल्यास क. ३२ (५) खालील गुन्हा होऊंच शकत नाहीं.

### सुप्रीम कोर्टाचा निर्णय

हा युक्तिवाद सुप्रीम कोर्टानें मान्य केला नाहीं. कंपनीची सर्व-साधारण सभा बोलाविण्याची जबाबदारी कंपनीच्या डायरेक्टरांची आहे. कंपनीची सर्वसाधारण सभा बोलावून २१ दिवसाचे आंत कंपनीच्या शेअरहोल्डरांची यादी आणि हिस्से भांडवलाचा गोषवारा त्यांनीं सादर केला नाहीं आणि त्याबद्दल जर खटला भरण्यांत आला तर कंपनीची सर्वसाधारण सभा झालीच नाहीं ही सबब बचावादाखल त्यांना पुढें करतां यावयाची नाहीं.

वर्षांतून एकदां तरी कंपनीची सर्वसाधारण सभा बोलावून सभेंत कंपनीच्या नफ्यातोट्याचें बॅलन्सशीट ठेवण्याची जबाबदारी डायरेक्टर लोकांची आहे असें कंपनी कायद्याच्या क. १३१ मध्यें म्हटलें आहे. तसें करावयास जर चुकलें तर क. १३३ ( ३ ) खालीं शिक्षा सांगण्यांत आली आहे. कंपनीची सर्वसाधारण सभा बोलावून त्या सभेंत कंपनीच्या नफ्यातोट्याचें बॅलन्सशीट न ठेवल्याबद्दल जर डायरेक्टर लोकांवर क. १३३ ( ३ ) खालीं खटला भरण्यांत आला तर कंपनीची सर्वसाधारण सभा झालीच नाहीं ही सबब डायरेक्टर लोकांना आपल्या बचावादाखल पुढें करतां येणार नाहीं.

वरीलप्रमाणें निकाल देऊन सुप्रीम कोर्टानें मुंबई राज्य सरकारचें अपील मंजूर केलें आणि मामला पुढें चालविण्याकरितां चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटकडे वापस पाठविला. —न्यायबोध

[ १९६० ऑ. इं. रि. सु. को. १८६ ]





बेडेकर
मसाले, लोणचीं
व पापड
आपल्या जेवणांत
विशेष लज्जत
आणतील.
वापरून पाहा.
मुगभाट, मुंबई ४.
शाखाः ठाकुरद्वार, दादर,
कोट व परळ.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

कौटुंबिक हितगुज

श्री. वा. काळे ह्यांनीं अत्यंत सोप्या व चटकदार भाषेंत लिहिलेल्या लेखमालेनें 'किर्लोस्कर'च्या हजारों वाचकांची पकड घेतली आहे. ह्या लेखमालेंतील निवडक लेख एकत्रित केलेला संग्रह 'किर्लोस्कर प्रेस'तर्फे प्रसिद्ध होत आहे.
पृ. सं. अंदाजें ११२ ] [ किंमत ३ रु.

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखकः – श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.